दैनिक जनप्रवास
गुरुवार, दि. ११ जुलै २०२४

# शिक्षकांनी विद्यार्थ्यांशी भावनिक सुसंवाद साधावा

## ■ प्राचार्य कुंभार : मूल्यांकन व प्रमाणीकरण पथक तपासणी



पद्मभूषण डॉ. वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, तासगाव येथे संस्थांतर्गत शाळासिद्धी मूल्यांकन व प्रमाणीकरण पथक तपासणी पार पडली. यावेळी उपस्तित शिक्षक, विद्यार्थ्यी

**जनप्रवास । तासगाव**

शिक्षकांनी अध्यापन करताना विद्यार्थ्यांचा कृतीयुक्त सहभाग वाढवावा आणि विद्यार्थ्यांशी भावनिक सुसंवाद करावा असे मत विद्यासमितीचे सचिव आणि विवेकानंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आर.आर.कुंभार यांनी व्यक्त केले.

पद्मभूषण डॉ. वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, तासगाव येथे संस्थांतर्गत शाळासिद्धी मूल्यांकन व प्रमाणीकरण पथक तपासणीच्या निमित्ताने आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते.

शिक्षकांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर अध्यापनात करून विद्यार्थी हित जोपासावे. स्वतः अपडेट राहून नवनवीन संकल्पना विद्यार्थ्यांना कृतीयुक्त समजून सांगण्याचा प्रयत्न करावा शिकवताना विद्यार्थी मंत्रमुग्ध झाला पाहिजे यासाठी विशेष प्रयत्न करावेत. शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे आणि संस्थामाता सुशीला देवी साळुंखे यांनी जी स्वप्ने पाहिली ती पूर्ण करण्यासाठी गुरुदेव कार्यकर्त्यांनी अथक प्रयत्न करावेत.विद्यार्थ्यांना शिकण्याची गोडी लावावी असे सांगून महाविद्यालयाने राबवलेल्या चांगल्या उपक्रमाचे कौतुक केले आणि आपल्या तपासणी अहवालातून महाविद्यालयाला 'अ' मानांकन जाहिर केले.

अध्यक्षस्थानावरून बोलताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मिलिंद हुजरे म्हणाले, शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या हृदयातील परमेश्वर पहावा. शिक्षणाचा मूळ हेतू माणूस घडवणे हाच आहे हे ध्यानात घेऊन शिक्षकांनी आधुनिक साधनांचा वापर करून अध्यापन करण्याचे आवाहन केले.

यावेळी पथकातील सदस्य प्रा. एस. टी. शिंदे, प्रा. डी. आर. पंडित, एस. ए. मोहिते, एस. एन.ढगे, एस. बी. साळुंखे, प्रा. यु. एच. तिजाईकर यांनी आपल्या मनोगतातून महाविद्यालयाने राबविलेल्या उपक्रमांचे कौतुक केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक ज्युनिअर विभागप्रमुख एस. डी.पाटील यांनी केले तर आभार शाळा प्रसिध्दी प्रमुख प्रा.एस.आर.पाटील यांनी मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.आरती पाटील आणि प्रा.साधना पाटील यांनी केले.

कार्यक्रमाला विज्ञान विभाग प्रमुख प्रा.पी.डी. पाटील, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. आण्णासाहेब बागल यांसह महाविद्यालयातील सर्व गुरुदेव कार्यकर्ते प्रशासकीय सेवक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लोकमत कोल्हापूर, रविवार, दि. ७ जुलै २०२४

# वाठारची प्रणाली पाटील एसीपीपदी

लोकमत न्यूज नेटवर्क

किणी : जिद्द व चिकाटीच्या जोरावर वाठार तर्फे वडगाव (ता. हातकणंगले) येथील प्रणाली रमेश पाटील हिची केंद्रीय सशस्त्र पोलिस दलात असिस्टंड कमांडंट (क्लासवन ऑफिसर) पदावर निवड झाली. यूपीएससीने घेतलेल्या परीक्षेत प्रणालीने हे उज्ज्वल यश संपादन केले.



केंद्रीय लोकसेवा आयोगाने घेतलेल्या परीक्षेचा निकाल शुक्रवारी लागला. प्रणालीचे प्राथमिक शिक्षण वाठार येथील जिल्हा परिषदेच्या कन्या विद्यामंदिर येथे, तर माध्यमिक शिक्षण किणी हायस्कूल व बारावीपर्यंतचे शिक्षण स्वामी विवेकानंद महाविद्यालयात झाले. युपीएससीचे ध्येय ठेवून प्रणालीने पुण्यातील सिद्धी विनायक महाविद्यालयात बी. ए.ची पदवी, तर भूगोल विषयातून एम.ए.ची पदवी सर परशुराम भाऊ महाविद्यालयातून पूर्ण केली. दिल्लीला जाऊन क्लास घेण्यासाठी आर्थिक पाठबळ नसताना जिद्दीच्या जोरावर अध्यात्म गुरू नरेंद्राचार्य, चाणक्य मंडळ यांच्या मार्गदर्शनाखाली मित्र, मैत्रिणींच्या चर्चेतून यश मिळाल्याचे प्रणालीने सांगितले

प्रणालीचे वडील रमेश पाटील हे गावोगावी जाऊन घरगुती साहित्याची विक्री करतात, तर आई घरकाम करतात.

मंगळवार, ९ जुलै २०२४

# प्रणाली पाटील केंद्रीय सशस्त्र पोलीस दलामध्ये क्लासवन ऑफिसरपदी

**नवे पारगाव :** वाठार तर्फ वडगाव (ता. हातकणंगले) येथील प्रणाली रमेश पाटील हिची केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या सीएपीएफ एसी परीक्षेतून केंद्रीय सशस्त्र पोलीस दलामध्ये क्लासवन ऑफिसरपदी निवड झाली.

केंद्रीय लोकसेवा आयोगा मार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेचा काल रात्री निकाल लागला. प्रणालीचे प्राथमिक शिक्षण वाठार येथील जिल्हा परिषदेच्या कन्या विद्यामंदिर, माध्यमिक शिक्षण किणी हायस्कूलमध्ये बारावीपर्यंतचे शिक्षण कोल्हापुरातील स्वामी विवेकानंद महाविद्यालयात झाले. यूपीएससीच्या अभ्यासासाठी प्रणालीने पुण्यातील सिद्धीविनायक महाविद्यालयात बी.ए.ची पदवी, तर भूगोल विषयातून एम.ए.ची पदवी सर परशुराम भाऊ महाविद्यालयात घेतली.



प्रणाली पाटील

किणी हायस्कूलमध्ये असताना विविध क्षेत्रांतील अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनातून यूपीएससीतून अधिकारी व्हायचे स्वप्न पाहिले. त्यानुसार तिने पुढील शिक्षण घेतले. घरची आर्थिक परिस्थिती कमकुवत असल्याने दिल्लीला जाऊन क्लास घेणे तिला शक्य नव्हते. अध्यात्म गुरू नरेंद्राचार्य, चाणक्य मंडळ यांच्या प्रेरणेतून, सिनिअर आणि मित्र-मैत्रिणींच्या ग्रुप चर्चेतून आपल्याला हे यश मिळाल्याचे प्रणालीने सांगितले.

09/07/2024

9.7.24

२ पुण्य नगरी ■ शुक्रवार, १९ जुलै २०२४

# विवेकानंद कॉलेजमध्ये 'नॅक'बाबत कार्यशाळा

**कोल्हापूर :** विवेकानंद कॉलेजमध्ये आयक्यूएसी आणि इंग्रजी विभागाच्या संयुक्त विद्यमाने प्रशासकीय कर्मचाऱ्यांसाठी 'नॅकला सामोरे जाताना' या विषयावर कार्यशाळा झाली. यामध्ये शिवाजी विद्यापीठाच्या सॉफ्ट स्कील ट्रेनर डॉ. वैशाली शिंदे यांनी पॉवर पॉइंट प्रेझेंटेशनद्वारे मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी गणित विभागप्रमुख प्रा. एस. पी. थोरात होते. आयक्यूएसी विभागाच्या समन्वयक डॉ. श्रुती जोशी यांनी प्रास्ताविक केले. इंग्रजी विभागप्रमुख डॉ. कविता तिवडे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. याचे आयोजन प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

रजिस्ट्रार आर. बी. जोग यांनी आभार मानले. सहायक ग्रंथपाल हितेंद्र साळुंखे, अधीक्षक एस. के. धनवडे, प्रा. माधुरी पवार, प्रा. कोमल व्होनखंडे यांच्यासह प्रशासकीय सेवक उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. सुप्रिया पाटील यांनी केले.

19/07/2024

19.7.24

# विवेकानंदमध्ये एमबीए, एमसीए सुरू : गावडे

**कोल्हापूर :** बदलत्या काळानुसार भविष्याची गरज ओळखून श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या विवेकानंद महाविद्यालयात



या शैक्षणिक वर्षापासून ए.आय. सी.टी.ई. मान्यताप्राप्त एम.बी.ए. आणि एम.सी.ए. हे पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरू होत आहेत. हे दोन्ही कोर्सेस शिवाजी विद्यापीठाशी संलग्न असून, दोन्हींची प्रवेश क्षमता ६० आहे, अशी माहिती संस्थेचे मुख्य कार्यकारी अध्यक्ष कौस्तुभ गावडे यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, संचालक वीरेन भिर्डी, एम.बी.ए. डिपार्टमेंटचे प्रमुख प्रा. विराज जाधव आणि एम.सी.ए. विभागप्रमुख प्रा. विजय पुजारी उपस्थित होते.

गावडे म्हणाले, भविष्यामध्ये भारताला मोठ्या प्रमाणामध्ये स्किल्ड मॅनेजर्सची आणि लीडर्सची गरज भासणार आहे. याचा विचार करून हे नवीन पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करत आहोत. स्टार्टअपसाठी लागणारे पोषक वातावरण हे दोन्ही कोर्सेसमार्फत देण्याचा संस्थेचा हेतू राहील. या दोन्ही अभ्यासक्रमांचा उद्घाटन सोहळा ३० जुलै रोजी संस्थेच्या मुख्य इमारत येथे अभिनेते सयाजी शिंदे यांच्या उपस्थितीत व कुलगुरू दिगंबर शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे.

## विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती, सवलती

दोन्ही अभ्यासक्रमांना राज्य व केंद्र शासनातर्फे दिल्या जाणाऱ्या सर्व शिष्यवृत्ती योजना लागू आहेत. याव्यतिरिक्त संस्था व्यवस्थापनातर्फे संस्थास्तरीय डॉ. ए. पी. जे अब्दुल कलाम मेरिट शिष्यवृत्ती आणि श्री स्वामी विवेकानंद शिष्यवृत्ती जाहीर केल्याची माहिती गावडे यांनी दिली. संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य डॉ. अभयकुमार साळुंखे, सचिव शुभांगी गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली या योजना राबवल्या जात आहेत.

# 'विवेकानंद'च्या विद्यार्थ्यांची 'वन कॅडेट वन ट्री' अंतर्गत अनोखी पदभ्रमंती

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विवेकानंद महाविद्यालयातील पाच महाराष्ट्र बटालियनमार्फत राबविण्यात आलेल्या पर्यावरण संवर्धन 'वन कॅडेट वन ट्री' संकल्पनेनुसार पर्यावरणीय अनोखी पदभ्रमंती आयोजित करण्यात आली.

पदभ्रमंती अतिग्रे व आरती या दोन्हीच्या सीमेवर असणाऱ्या जल विभाजक रामलिंग अल्लम प्रभू व धुळोबा डोंगरावर करण्यात आली. पदभ्रमंतीमध्ये वृक्ष लागवड, जलकोश भरण व धार्मिक स्थळावरील कचरा संकलन या गोष्टी करण्यात आल्या.

शंभर वृक्षांच्या पायालगत जल पुनर्रोपणासाठी दगडांची रचना करण्यात आली. पदभ्रमंतीमध्ये ३५ किलोमीटरचे अंतर विद्यार्थ्यांनी पूर्ण केले. धार्मिक स्थळावरील पर्यटकांनी केलेल्या कचऱ्याचे संकलन करण्यात आले.

10/7/2024

10.7.24

पुढारी MY कोल्हापूर बुधवार १७ जुलै २०२४

# 'विवेकानंद'मध्ये नवनियुक्त शिक्षकांचे उद्‌बोधन

**कोल्हापूर :** येथील विवेकानंद कनिष्ठ महाविद्यालयामध्ये शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी नवनियुक्त शिक्षकांचे उद्‌बोधन घेण्यात आले. शाळा सिद्धीप्रमुख प्रा. गीतांजली साळुंखे यांनी शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या जीवन कार्यावर व्याख्यान दिले. ज्युनिअर सायन्स विभागप्रमुख प्रा. एम. ए. कुरणे यांनी प्रास्ताविक केले. स्टाफ सेक्रेटरी के. जे. गुजर यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे नियोजन विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

10

18.07.24

पुढारी संमिश्र कोल्हापूर, गुरुवार, १८ जुलै २०२४




भोपाळ : उपविजेत्या ऋषीकेशला मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.

# ऋषीकेश कबनूरकर उपविजेता

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

मध्य प्रदेशमधील भोपाळ येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय फिडे रेटिंग बुद्धिबळ स्पर्धेत कोल्हापूरच्या ऋषीकेश कबनूरकरने १९०० रेटिंग गटात उपजेतेपद संपादन केले. त्याने ९ पैकी ७ गुण घेत द्वितीय क्रमांक पटकावला. या यशामुळे ऋषीकेशच्या फिडे रेटिंगमध्ये ७९ गुणांची भर पडली आहे. या स्पर्धेत देशभरातील २९७ बुद्धिबळपटू सहभागी झाले. यातील २१३ बुद्धिबळपटू रेटिंगधारक होते.

ऋषीकेश विवेकानंद कॉलेजमधील बाराव्या इयत्तेत शिकत असून, त्याला बुद्धिबळ प्रशिक्षक कृष्णात पाटील, माधव देवस्थळी, स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे प्राचार्य आर. आर. कुंभार यांचे मार्गदर्शन, तर पालक शशिकांत-श्वेता कबनूरकर यांचे प्रोत्साहन लाभत आहे.

पुढारी MY कोल्हापूर बुधवार, २४ जुलै २०२४

# 'विवेकानंद'च्या चेतन पवारचे आंतरराज्य नेमबाजी स्पर्धेत यश

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा



विवेकानंद महाविद्यालयातील एनसीसी विभागातील चेतन पवार याने त्रिची तामिळनाडू येथे झालेल्या आंतरराज्य नेमबाजी स्पर्धेत यश मिळवले. नेमबाजी स्पर्धेसाठी सावंतवाडी-पुणे येथे प्रत्येकी ३० दिवसांचे शिबिर झाले. शिबिरासाठी संपूर्ण महाराष्ट्रातील एनसीसीमध्ये असणाऱ्या कॅडेट्समधून १३ कॅडेट्सची निवड तामिळनाडूतील राष्ट्रीय सराव शिबिरा करता निवड झाली होती. नेमबाजीची कोणतीही पार्श्वभूमी नसताना व नेमबाजी प्रशिक्षण ॲकॅडमीशिवाय चेतनने यश मिळविले आहे. राष्ट्रीय सराव शिबिरातून त्याची निवड राष्ट्रीय संघात महाराष्ट्र एनसीसी डायरेक्टरकडून झाली आहे. यशाबद्दल त्याचा प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सत्कार प्रसंगी महाविद्यालयाच्या आय. क्यू. ए. सी.च्या विभाग प्रमुख डॉ. श्रुती जोशी, लेफ्टनंट जितेंद्र भरमगोंडा उपस्थित होते.

सकाळ
कोल्हापूर, रविवार, ७ जुलै २०२४

# केंद्रीय सशस्त्र पोलिस दल अधिकारीपदी प्रणाली पाटील


प्रणाली पाटील

घुणकी, ता. ६ : वठार तर्फे वडगाव (ता. हातकणंगले) येथील प्रणाली रमेश पाटील हिची केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या सीएपीएफएसी परीक्षेतून केंद्रीय सशस्त्र पोलिस दलामध्ये अधिकारी वर्ग - १ पदी निवड झाली. दुसऱ्या प्रयत्नात तिला यश मिळाले.

परीक्षेचा आज शुक्रवारी निकाल लागला. प्रणालीचे प्राथमिक शिक्षण वाठार येथील जिल्हा परिषदेच्या कन्या विद्या मंदीर, माध्यमिक शिक्षण किणी हायस्कूल किणी, बारावीपर्यंतचे शिक्षण कोल्हापुरातील स्वामी विवेकानंद महाविद्यालयात झाले. युपीएससीच्या अभ्यासासाठी प्रणालीने पुण्यातील सिद्धिविनायक महाविद्यालयात बी. ए. ची पदवी तर भूगोल विषयातून एम.ए.ची पदवी सर परशुराम भाऊ महाविद्यालयात घेतली.

08/07/2024

सकाळ
कोल्हापूर, गुरुवार, १८ जुलै २०२४

# नासा कॉन्फरन्ससाठी लीनाची निवड



लीना शिरोळकर

**कंदलगाव** : नवीन संकल्पनेतून जगभरातील वेगळे संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या जागतिक कॉन्फरन्ससाठी येथील लीना संजय शिरोळकर हिची निवड झाली आहे. कॉन्फरन्ससाठी जगभरातून १२० व भारतातून १० जणांची निवड झाली आहे. त्यामध्ये कोल्हापूरच्या लीना शिरोळकर हिचा समावेश आहे. ही कॉन्फरन्स अमेरिकेतील टेक्सास येथे आहे. लीना शिरोळकर हिने मास्टर ऑफ डाटा सायन्स व कृत्रिम बुद्धिमत्ता या विषयातून पदवी घेतली आहे. ती सध्या जर्मनीत मर्सिडीज बेंझ कंपनीत सेवेत आहे. लीना ही राजारामपुरीतील श्रीराम विद्यालय, तवनाप्पा पाटणे हायस्कूल, विवेकानंद कॉलेज व केआयटीची माजी विद्यार्थिनी आहे.

31/07/2024

18.07.24

सकाळ
कोल्हापूर, शुक्रवार, १९ जुलै २०२४

# हृषीकेश कबनूरकरचे फिडे रेटिंग स्पर्धेत यश

**कोल्हापूर :** भोपाळ (मध्यप्रदेश) येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय फिडे रेटिंग बुद्धिबळ स्पर्धेत हृषीकेश कबनूरकर याने ९ फेरीत ७ गुण मिळवून १९०० रेटिंग गटात उपविजेतेपद पटकावले. त्याला रोख रक्कम व चषक देऊन गौरविण्यात आले. या यशामुळे त्याचे फिडे रेटिंग ७९ ने वाढले आहे. स्पर्धेत एकूण २९७ खेळाडू सहभागी झाले होते. हृषीकेशला बुद्धिबळ प्रशिक्षक कृष्णात पाटील व माधव देवस्थळी यांचे मार्गदर्शन लाभले. तो विवेकानंद महाविद्यालयात बारावीमध्ये शिकत असून, त्याला श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्थेच्या सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, संस्थेचे सी.ई.ओ. कौस्तुभ गावडे यांचे प्रोत्साहन लाभले. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, जिमखानाप्रमुख प्रा. विकास जाधव, प्रा. संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण, सुरेश चरापले यांचे सहकार्य लाभले.



हृषीकेश कबनूरकर

सकाळ

कोल्हापूर, बुधवार, २४ जुलै २०२४

# 'विवेकानंद'मध्ये एमबीए, एमसीए पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरू

कोल्हापूर, ता. २३ : विवेकानंद महाविद्यालयात यंदापासून ऑल इंडिया कौन्सिल फॉर टेक्निकल एज्युकेशन (एआयसीटीई) मान्यताप्राप्त एमबीए व एमसीए पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरू होत आहेत, अशी माहिती स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांनी पत्रकार परिषदेत दिली. अभिनेते सयाजी शिंदे व कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते एमबीए, एमसीए अभ्यासक्रमाचे मंगळवारी (ता. ३०) उद्‍घाटन आहे, असेही त्यांनी सांगितले.

श्री. गावडे म्हणाले, ''शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित दोन्ही अभ्यासक्रम आहेत. प्रवेशक्षमता ६० आहे. डॉ. ए. पी. जे अब्दुल कलाम मेरिट शिष्यवृत्ती योजनेंतर्गत जे विद्यार्थी एमबीए, एमसीए अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतील, त्यांना त्यांच्या एमबीए, एमसीएच्या एमएएच-सीईटीत मिळवलेल्या टक्क्यांनुसार शैक्षणिक शुल्कात सवलत मिळेल. प्रवेश परीक्षेत ८५ टक्के किंवा त्यापेक्षा अधिक गुण मिळवलेल्या विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाच्या कालावधीत शंभर, ७५ ते ८४.९९ टक्के गुण मिळवलेल्यांना ७५, तर ६५ ते ७४.९९ टक्के गुण मिळवलेल्यांना ५० टक्के शुल्क माफ होईल. स्वामी विवेकानंद शिष्यवृत्ती योजनेंतर्गत महाविद्यालयात पदवीचे शिक्षणं पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतल्यानंतर शुल्कामधील पंधरा हजार रुपये प्रतिवर्ष शुल्क शैक्षणिक कालावधीसाठी माफ होईल. शिष्यवृत्तीसाठी संस्थेने २० लाखांची तरतूद केली आहे.''

ते म्हणाले, ''स्टार्टअपसाठीचे पोषक वातावरण दोन्ही अभ्यासक्रमांतर्फे देण्याचा हेतू राहील. एमबीए प्रोग्रामअंतर्गत मार्केटिंग, एचआर, बँकिंग अ‍ॅन्ड फायनान्स, ऑपरेशन्स अ‍ॅन्ड सप्लाय चेन मॅनेजमेंट, बिझनेस अ‍ॅनॅलिटिक्स स्पेशलायझेशन्ससारखे अभ्यासक्रम उपलब्ध करत आहे.'' यावेळी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, व्यावसायिक शिक्षण समूहाचे संचालक वीरेन भिर्डी, एमबीए विभागप्रमुख प्रा. विराज जाधव, एमसीए विभागप्रमुख प्रा. विजय पुजारी उपस्थित होते.

24/07/2024

RE 24.7.24

तरुण भारत
शनिवार, ६ जुलै २०२४

# वाठारची प्रणाली पाटील सशस्त्र पोलीस दलामध्ये क्लासवन ऑफिसर



**घुणकी :** वाठार (ता. हातकणंगले) येथील प्रणाली रमेश पाटील हिची केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेतून केंद्रीय सशस्त्र पोलीस दलामध्ये क्लासवन ऑफिसरपदी निवड झाली. या परीक्षेचा रात्री निकाल लागला. प्रणालीचे प्राथमिक शिक्षण वाठार येथील जिल्हा परिषदेच्या कन्या विद्या मंदीर, माध्यमिक शिक्षण किणी हायस्कूल किणी, बारावीपर्यतचे शिक्षण कोल्हापुरातील स्वामी विवेकानंद महाविद्यालयात झाले. युपीएससीच्या अभ्यासासाठी प्रणालीने पुण्यातील सिध्दी विनायक महाविद्यालयात बी. ए. ची पदवी तर भूगोल विषमयातून एम.ए.ची पदवी सर परशुराम भाऊ महाविद्यालयात घेतली. वडील रमेश पाटील गावोगावी जाऊन घरगुती साहित्याची विक्री करतात आर्थिकस्थितीमुळे दिल्लीला जाऊन क्लास घेणे शक्य नव्हते. अध्यात्म गुरु नरेंद्राचार्य, चाणक्य मंडळ यांच्या प्रेरणेतून, सिनीयर आणि मित्र, मैत्रिणींच्या ग्रुप चर्चेतून यश मिळाल्याचे प्रणालीने सांगितले.

6/07/2024

तरुण भारत संवाद

बुधवार, १७ जुलै २०२४

# विवेकानंदमध्ये नॅकसंदर्भात कार्यशाळा

**कोल्हापूर :** विवेकानंद कॉलेजमध्ये आयक्युएसी आणि इंग्रजी विभागाच्या संयुक्त विद्यमाने प्रशासकीय कर्मचाऱ्यांसाठी 'नॅकला सामोरे जाताना' या विषयावर कार्यशाळेचे आयोजन केले होते. अध्यक्षस्थानी गणित विभागप्रमुख प्रा. एस. पी. थोरात होते. शिवाजी विद्यापीठातील सॉफ्ट स्कील ट्रेनर डॉ. वैशाली शिंदे यांनी पॉवर पॉईंट प्रेझेंटेशनद्वारे मार्गदर्शन केले. 'संवाद कौशल्ये व शिष्टाचार' हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. डॉ. श्रुती जोशी यांनी प्रास्ताविकात महाविद्यालय नॅक च्या चौथ्या सायकलला सामोरे जात असून पिअर टीम प्रत्यक्ष भेटीवेळी करावी लागणारी तयारी यांसाठी या कार्यशाळेचे आयोजन केल्याचे सांगितले. इंग्रजी विभागप्रमुख डॉ. कविता तिवडे यांनी पाहुण्यांचा परिचय करुन दिला. सूत्रसंचालन प्रा सुप्रिया पाटील यानी केले. महाविद्यालयाचे कुलसचिव आर. बी. जोग यांनी आभार मानले. यावेळी सहाय्यक ग्रंथपाल हितेंद्र साळुंखे, अधीक्षक एस. के. धनवडे, प्रा. माधुरी पवार, प्रा. कोमल व्होनखंडे आदी उपस्थित होते.

18/07/2024

18.07.2024

तरुण भारत संवाद
शनिवार २० जुलै २०२४

# आंतरराष्ट्रीय फिडे रेटिंग बुद्धिबळ स्पर्धेत ऋषिकेश उपविजेता

१९०० फिडे रेटिंग गटात कामगिरी : स्पर्धेच्या मेरिटमध्येही पटकावले आठव्या स्थानासह ७९ रेटिंग

प्रतिनिधी
कोल्हापूर

भोपाळ (मध्यप्रदेश) येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय फिडे रेटिंग बुद्धिबळ स्पर्धेतील १९०० फिडे रेटिग या गटात कोल्हापूरच्या ऋषिकेश कबनुरकरने ९ फेरीत ७ गुण मिळवून उपविजेतेपद पटकावले. तसेच त्याने स्पर्धेच्या मेरिटमध्ये आठवा क्रमांकही प्राप्त केला.

भोपाळ बुद्धिबळ असोसिएशनच्या वतीने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. बक्षीस वितरण समारंभात ऋषिकेशला १५ हजार रुपये आणि चषक देऊन सन्मानित करण्यात आले.

ऋषिकेशने महाराष्ट्रातर्फे स्पर्धेत प्रतिनिधीत्व केले. त्याने स्पर्धेतील ९ पैकी ६ सामन्यांमध्ये नामवंत बुद्धिबळपटूंना पराभूत करत सहा गुणांची कमाई केली. दोन अवघड सामन्यात त्याने चाणाक्षपणे बरोबरी साधत १ गुण प्राप्त केला. एका सामन्यात त्याला पराभव पत्करावा लागला. स्पर्धेतील एकुणच उठावदार कामगिरीमुळे ऋषिकेशच्या मुळच्या १८२६ फिडे रेटिंगमध्ये ७९ रेटींगची भर पडली आहे.



कोल्हापूर : आंतरराष्ट्रीय फिडे रेटिंग बुद्धिबळ स्पर्धेत यश मिळवलेल्या ऋषिकेश कबनुरकरला बक्षीस देऊन गौरवताना मान्यवर.

### ऋषिकेशने ऑल इंडिया चॅम्पियनला हरवले

स्पर्धेतील नवव्या फेरीत ऋषिकेशची तामिळनाडूतील एकेकाळचा ऑल इंडिया चॅम्पियन हरिष शर्मा याच्याशी लढत झाली. पाच वेळेचा विश्वविजेता असलेल्या विश्वनाथन आनंदला हरिषने एकेकाळी पराभूत केले होते. त्यामुळे नवव्या फेरीत कोण जिंकणार याची उत्सुकता लागून राहिली होती. शिवाय लढत सुरु करण्यापूर्वी ऋषिकेश व हरिष हे दोघेही प्रत्येकी ६ गुणांनी आघाडीवर होते.

या महत्वपूर्ण लढतीत हरिषला पराभूत केल्यानंतर ऋषिकेशचा स्पर्धेच्या १९०० फिडे रेटिग या गटात उपविजेतेपद कब्जा होणार होता. ऋषिकेशनेही अतिशय संयमाने चाली करत हरिषला पराभूत करत एक गुणाची कमाई केली. या गुणामुळे त्याला उपविजेतेपद मिळाले, असे ऋषिकेशचे प्रशिक्षक कृष्णात पाटील यांनी सांगितले.

दरम्यान, या स्पर्धेत भारतातील २९७ बुद्धिबळपटू सहभागी झाले होते. त्यापैकी २१३ जण फिडे रेटिंग मिळवलेले होते. स्पर्धेतील उपविजेता ऋषिकेश हा स्वामी विवेकानंद महाविद्यालयात शिकत असून त्याला श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिव व प्राचार्य शुभांगी गावडे, संस्थेचे सीईओ कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, जिमखाना विभाग प्रमुख प्रा. विकास जाधव व प्रशिक्षक माधव देवस्थळी यांचे मार्गदर्शन लाभत आहे.

तरुण भारत संवाद

मंगळवार २३ जुलै २०२४

# शुभम जाधवची राष्ट्रीय हॉकी स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात निवड

प्रतिनिधी
कोल्हापूर

विवेकानंद कॉलेजमध्ये बी. ए. भाग एकमधील शुभम जाधव याची सेकंड हॉकी इंडिया वेस्ट झोन चॅम्पियनशीप स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात निवड झाली आहे. ही स्पर्धा छत्तीसगड येथे २१ ते २८ जुलै दरम्यान होणार आहे. पुणे येथे झालेल्या निवड चाचणीमध्ये महाराष्ट्राच्या विविध जिल्ह्यातून आलेल्या ८० खेळाडूमधून त्याची निवड झालेली आहे. शुभम जाधव याला प्रशिक्षक सागर जाधव व योगेश देशपांडे यांचे मार्गदर्शन लाभले. शुभमच्या या यशाबद्दल



स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्था सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, रजिस्ट्रार आर. बी. जोग यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. त्याला जिमखाना विभाग प्रमुख डॉ. विकास जाधव, प्रा. संतोष कुंडले, प्रा. समिर पठाण, प्रा. प्रशांत कांबळे, सुरेश चरापले यांचे प्रोत्साहन मिळाले.

23/07/2024

23/7/24

तरुण भारत
कोल्हापूर
www.tarunbharat.com
बुधवार दि. २४ जुलै २०२४

# विवेकानंदमध्ये एमबीए, एमसीए अभ्यासक्रम सुरू होणार

▪ स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांची माहिती

प्रतिनिधी
कोल्हापूर

स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेत २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून एमबीए आणि एमसीए पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहे. या अभ्यासक्रमांना एआयसीटीईची मान्यता आहे. संस्थेचा पदवीधर विद्यार्थी असेल तर १५ हजार रुपये प्रवेशामध्ये सुट दिली जाणार आहे. तसेच शासनाच्या शिष्यवृत्तीसह संस्थेच्या वतीनेही शिष्यवृत्ती सुरू केली आहे. बदलत्या काळानुसार कौशल्याधिष्टीत शिक्षण देऊन उद्योजक तयार करण्याचा प्रयत्न सुरू आहे. त्यासाठी स्टार्टअप इन्क्युबेशन केंद्र स्थापन केले असून बाजारात चालणाऱ्या उत्कृष्ट स्टार्टअपला संस्था आर्थिक मदतही करणार आहे, अशी माहिती आयोजित पत्रकार परिषदेत स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांनी दिली.

गावडे म्हणाले, एमबीए अंतर्गत मार्केटिंग, एचआर, बँकिंग अँड फायनान्स, ऑपरेशन्स अँड सप्लाय चेन मॅनेजमेंट, बिझनेस ॲनॅलिटिक्स स्पेशलायझेशन्स ऑफर हे अभ्यासक्रम सुरू केले आहेत. एमबीए व एमसीएच्या विद्यार्थ्यांसाठी डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम मेरीट शिष्यवृत्ती सुरू केली आहे. त्यामध्ये प्रवेश परीक्षेमध्ये ज्यांना ८५ पर्सेंटाईल गुण मिळाले आहेत त्यांना १०० टक्के ट्युशन फी माफ केली जाणार आहे. ज्यांना ७५ ते ८४.९९ पर्सेंटाईल गुण मिळाले आहेत त्यांना ७५ टक्के ट्युशन फी माफ केली जाईल. व ज्यांना ६५ ते ७४.९९ टक्के गुण मिळाले आहेत त्यांना ५० टक्के ट्युशन फी माफ केली जाईल. श्री स्वामी विवेकानंद शिष्यवृत्ती अंतर्गत संस्थेतील पदवीधर असल्यास १५ हजार रूपये प्रतीवर्षी ट्युशन फी संस्था भरणार आहे. एमबीए व एमसीए अभ्यासक्रमासाठी ६० टक्के प्रॅक्टिकल व ४० टक्के थेअरी असेल. त्यामुळे वर्ग सुरू झालेल्या पहिल्या दिवसापासून विद्यार्थ्यांना सॉफ्ट स्किल आणि कम्युनिकेशन स्किलचे प्रशिक्षण दिले जाते. प्लेसमेंट वाढवण्यासाठी १५० कंपन्यांबरोबर सामंजस्य करार केला आहे.

गतवर्षी २५० प्लेसमेंट झाल्या आहेत. नामांकित कंपन्यांमध्ये प्लेसमेंट देण्याची हमी महाविद्यालय घेते. तसेच या अभ्यासक्रमाबरोबर क्रडीटवरील तंत्रज्ञानावर आधारीत दोन पदविकांच्या अभ्यासक्रम पूर्ण केले पाहिजेत, अशी अट घातली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे स्कील आपोआप वाढते. जेणेकरून नोकरी करण्यापेक्षा नोकरी देणारे उद्योजक बनवण्यावर जास्त भर दिला जाणार आहे. अत्याधुनिक क्लासरूम आणि लॅब उपलब्ध करून दिली आहे. तसेच अनुभवी स्टाफदेखील आहे.

या अभ्यासक्रमाचे उद्घाटन ३० जुलै रोजी अभिनेता सयाजी शिंदे यांच्या होणार आहे. तर अध्यक्षस्थान कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के भूषवणार आहेत. यावेळी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, व्यवसायिक शिक्षण समूहाचे संचालक वीरेन भिर्डी, एमबीए विभागप्रमुख प्रा. विराज जाधव, एमसीए विभागप्रमुख प्रा. विजय पुजारी आदी उपस्थित होते.

24/07/2024
24.7.24